## अपील क्र. MHSICMU/२०२३/M/००१३६४
## अपिलार्थी श्री. कमलाकर शेणॉय

**सुनावणी दिनांक : १५.०७.२०२६ (In continuation of order dt २७.०५.२०२६)**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, ते संबंधीत जन माहिती अधिकारी नाहीत. त्यांनी वेळेची मागणी केली. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. पुढील सुनावणीच्या वेळी संबंधीत जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी, आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई यांनी प्रतिनिधी न पाठविता स्वत: प्रत्यक्ष उपस्थित रहावे असे आयोगाने आदेशित केले होते.

२. आजच्या सुनावणी वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित असून अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, मागील सुनावणी आदेशामध्ये आयोगाने स्पष्ट नमुद केले होते की, पुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रतिनिधी न पाठविता स्वत: प्रत्यक्ष उपस्थित रहावे. परंतु, आजरोजी प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित नाहीत व उपस्थित जन माहिती अधिकारी हे तत्कालीन जन माहिती अधिकारी नव्हते.

३. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, त्यांनी सदर पदाचा कार्यभार काही दिवसांपूर्वी स्विकालेला आहे व आता सदर प्रकरणी ते विद्यमान जन माहिती अधिकारी आहेत. तसेच ते प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधित्व करतात. परंतु, जन माहिती अधिकारी हे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांना प्राधिकृत केल्याचे पत्र आयोगासमोर सादर करु शकले नाहीत.

४. अपिलार्थी यांनी त्यांचे लेखी सादर करुन नमुद केले की, माहिती अर्जातील मुद्दा क्र. १ व २ ची माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ८(१)(ज) प्रमाणे नाकारण्यात आलेली आहे व जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर अयोग्य आहे. कारण सदर प्रकरणी कोणतीही एफआयआर नोंदविलेली नाही आणि जोपर्यंत एफआयआर नोंदविलेली नाही, तोपर्यंत भारतीय न्यायसंहिता चॅप्टर १३ प्रमाणे investagation सुरु आहे असे म्हणता येणार नाही.

५. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, सदर प्रकरणी enquiry सुरु आहे. अपिलार्थी यांनी यावर आक्षेप घेऊन आयोगास नमुद केले की, न्यायिकदृष्ट्या enquiry आणि investigation याचा अर्थ एकसारखा होत नाही आणि जोपर्यंत एफआयआर नोंदविलेला नाही तोपर्यंत कलम ८(१)(h) अन्वये माहिती नाकारता येत नाही. तसेच सदर प्रकरणी कोणाच्याही जिवितेस धोका संभवत नाही म्हणून माहिती अधिकार अधिनियमचे कलम ८(१)(g) अन्वये माहिती नाकारणे योग्य नाही. अपिलार्थींनी आयोगास पुढे नमुद केले की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहितीचा अधिकार अधिनियमचे कलम ७(८)(१) प्रमाणे माहिती नाकारण्याचे कारणे स्पष्ट नमुद करुन कळविणे आवश्यक आहे. जे की, त्यांना देण्यात आले नाही. तसेच माहितीचा अधिकार अधिनियमचे कलम १९(५) अन्वये जन माहिती अधिकारी यांनी त्यांना लेखी कळविले पाहिजे. अपिलार्थींनी आयोगास नमुद केले की, कार्यालयीन

..२/-



CamScanner

टिप्पणीची प्रत माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत देय आहे. तसेच त्यांनी महाराष्ट्र शासन, गृह विभाग यांनी दि. १७.०६.२०१६ रोजी निर्गमित केलेले शासन निर्णय सादर करुन त्यांनी केलेली तक्रारीवर अहवाल प्रत अपेक्षित असताना जन माहिती अधिकारी यांनी त्यांना फाईल movement तसेच कार्यालयीन टिप्पणीची प्रत नाकारलेली आहे. अपिलार्थीनी आयोगास नमुद केले की, माहितीचा अधिकार अधिनियमचे कलम २(f) व २(h) मध्ये व्याख्या देण्यात आली आहे. त्याप्रमाणे माहिती नाकारता येत नाही. अपिलार्थींनी नमुद केले की, सदर प्रकरणी म्हाडाशी संबंधीत फार मोठ्या प्रमाणात अनियमितता निदर्शनास आल्याने जन माहिती अधिकारी यांच्याकडे तक्रार केली आहे. त्याप्रमाणे माहिती अर्जात नमुद मुद्यांवर माहिती अपेक्षित आहे. तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय यांनी आयोगाचे स्पष्ट आदेशाचे उल्लंघन केल्याने त्यांच्याविरुध्द अनुक्रमे दंडात्मक व शिस्तभंगविषयक कार्यवाहीची मागणी केली.

६. अपिलार्थी यांनी आयोगास असेही सादर केले की, महाराष्ट्र शासन, गृह विभागाचे परिपत्रक दि.१७.०६.२०१६ नुसार जन माहिती अधिकारी तक्रारीची दखल घेत नाहीत, तक्रार रजिस्टर ठेवत नाही व लोकांना भेटत नाहीत. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक दि.२३.११.२०१६ नुसार अभ्यांगतांना अभिप्रायासाठी फॉर्म ठेवत नाहीत.

७. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच संवेदनशील प्रकरणात चौकशी सुरु असल्याने अपिलार्थींना संबंधीत नस्तीची कार्यालयीन टिप्पणीची प्रत देता येणार नाही व त्यांनी अपिलार्थींना प्राथमिक चौकशी विषयी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपिलार्थींनी सादर केले की, या विषयी त्यांना माहिती देण्यात आली नाही. जन माहिती अधिकारी यांनी पोलीस ठाणे दैनंदिनीची प्रत आयोगासमोर सादर केली.

८. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराच्या अनुषंगाने अधिकची माहिती/ स्पष्टीकरण उपलब्ध करुन देण्याकरीता वेळेची मागणी केली. जन माहिती अधिकारी यांची मागणी मान्य करण्यात येत आहे.

९. पुढील सुनावणीस तत्कालीन जन माहिती अधिकारी, श्री. राजेश ओझा व प्रथम अपिलीय अधिकारी, श्री. संग्रामसिंह निशाणदार यांनी अपिलार्थींनी माहिती अर्जात नमुद केलेले मुद्दे व अपिलार्थींनी आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकाऱ्यांच्या उत्तरावर उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने त्यांचे लेखी निवेदनासह प्रत्यक्ष उपस्थित रहावे. तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी आयोगास सादर केलेल्या लेखी निवेदनाची एक प्रत अपिलार्थींना उपलब्ध करुन द्यावी. प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी आज रोजी सुनावणीस अनुपस्थिती विषयी आयोगास खुलासा सादर करावा. विद्यमान जन माहिती अधिकारी, श्री. किशोर परब यांचीही उपस्थिती पुढील सुनावणीस आवश्यक आहे.

## आदेश

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ०८.०९.२०२६ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

प्रदीप व्यास 20-7-2026

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : २०.०७.२०२६**

CamScanner